# पर्यावरण प्रभाव आघात आकलन व पर्यावरण व्यवस्थापन योजनेचा संक्षिप्त सारांश

(संदर्भ : वन आणि पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार द्वारा अधिसूचना क्र. १५३३ (अ) दि १४ सप्टेंबर २००६ अनुसार)

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर

# बहीलामपुर चुनखडी/डोलोमाइट खाण

गाव– बहीलामपुर, ता. झरी–जमनी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र

(क्षेत्र–४७.१२ हे, उत्पादन–०.०५ द.ल.टन/वर्ष)

प्रकल्प पुरस्कर्ते

**मे. श्री. राजा खंडेराव देशमुख पालशीकर**

५, पार्थ संकुल, कैलाश नगर

पोस्ट–नांदेड, जिल्हा– नांदेड

सप्टेंबर २०१६

# कार्यकारी सारांश

## परिचय :–

बहीलामपुर चुनखडी/डोलोमाइट खाण (४७.१२ हे.) ही श्री राजा खंडेराव देशमुख पालशीकर हयांची व्ययक्तीक स्वरुपाची खाण असुन ही बहीलामपुर गाव, तहसील झरी–जमनी, जिल्हा–यवतमाळ, महाराष्ट्र येथे स्थित आहे. हया खाणेची उत्पादन क्षमता ०.०५ अ.ल. टन/वर्ष इतकी आहे.

प्रस्तावित चुनखडी/डोलोमाइट खाण (४७.१२ हे.) ही श्यांत्रीकीकरण तसेच फावडे व डम्परच्या साहाय्याने खुली खदान (opencast) म्हणून विकसित केली जाईल. तज्ञ मूल्यमापन समिती (EAC) द्वारा १५–१६ जानेवारी २०१५ दरम्यान झालेल्या २९ थ्या बैठकीत, प्राथमिक अभ्यासाकरिता या प्रकल्पाला मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार अंगीकृत कार्य संदर्भ (TOR) EAC (खनन–२) MoEF नवी दिल्ली द्वारा EIA च्या अभ्यासाकरिता निकष निर्धारित केले आहे. सोबत जोडलेला प्रकल्प अहवाल या निकषांवर आधारीत आहे.




...................................

**स्थान तपशिल** :– प्रस्तावित चुनखडी/डोलोमाइट खाणीच्या स्थानाची आकृती बाजुला दिली आहे. प्रस्तावित खाणीचे क्षेत्रफळ ४७.१२ हे. आहे. हे स्थान सर्वे ऑफ इंडियाच्या टोपोशिट क्र. ५६ आय/ १३ मधे १:५०,००० च्या स्केलवर १९°४६’०८.५’’उ. ते १९°४६’४७.५’’उ. अक्षांश आणि ७८°४९’३८.६’’पू. ते ७८°५०’०१.२ पू. रेखांशवर स्थित आहे.

**सुगमता (**Accessibility) – प्रस्तावित खनन क्षेत्र नागपुरपासून ते यवतमाळ जिल्हयातील वणीपर्यंत आणि नंतर वणीपासुन मुकुटवन पर्यंत सुमारे ४५ किमी अंतरावर वणी मुकुटवन रस्त्यावर स्थित आहे. बहीलामपुर गाव हे मुकुटवनपासुन ७ किमी अंतरावर आहे. खाण क्षेत्र हे यवतमाळ पासुन सुमारे १३२ किमी अंतरावर स्थित आहे.

**जमीनीचा वर्तमानातील उपयोग** – प्रस्तावित खनन क्षेत्र ४७.१२ हे. आहे. त्यापैकी ०४.२२४ हे. खाजगी जमिन असून ४२.८९६ हे. सरकारी जमिन आहे.

**भूगर्भ संरचना व मातीचे साठे –** या क्षेत्राची प्रादेशिक भूगर्भीय संरचना ही पेनगंगा बेड (Vindhyans) गोंडवाना फारमेशन, लॅमेटा बेडस् (Intratrappeans) व Basaltic ज्वालामुखीतून बाहेर फेकला जाणारा तप्त शिलारस प्रवाह (Deccan traps) ने बनली आहे. ह्या चुनखडी/डोलोमाइट चे एकुण भुगर्भीय खनिज साठे ११,९२२,५५० टनस आहेत व त्यापैकी केवळ ५,९६१,२७५ टन खनिज खनन योग्य आहे. या खाणीतून ०.०५ द.ल.टन /वर्ष चुनखडी/डोलोमाइट चे उत्पादन प्रस्तावित केले आहे.

**खनन पध्दती** – खनन प्रक्रियेसाठी खुल्या यांत्रिक खनन (Opencast) पध्दतीचा अवलंब केला जाईल. या खनन प्रक्रिये अंर्तगत ड्रीलींग व इतर कार्याकरीता डिझेल कॉंप्रेसर (Compressor) व जॅकहॅमर ड्रिल (Jackhammer Drill) चा वापर केला जाईल. स्फोट करून चुनखडी/डोलोमाइट काढणे व पुष्ठभागावर त्यांची छाटनी करणे ह्या क्रिया अंर्तभूत आहे. चुनखडी/डोलोमाइट वरिल आच्छादन (capping) म्हणजे मातीचा थर आहे.

**टेबल १ चुनखडी/डोलोमाइटचे वर्षिक उत्पादन**

| वर्ष | रोम ओर मी$^3$ | रोम ओर टनस् | ग्रेडेड ओर ९०% टनस् | रिजेंक्ट १०% टनस् | माती/आबी मी$^3$ | बेंच आर. एल. एम. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०,१०० | ५०,२५० | ४५,२२५ | ५,०२५ | ३३५ | २२२ |
| २ | २०,१०० | ५०,२५० | ४५,२२५ | ५,०२५ | ३३५ | २२२ |
| ३ | २०,१०० | ५०,२५० | ४५,२२५ | ५,०२५ | ३३५ | २२२ |
| ४ | २०,५०२ | ५१,२५५ | ४६,१३० | ५,१२५ | ३४२ | २२२ |
| ५ | २०,४६० | ५१,१५० | ४६,०३५ | ५,११५ | निल | २१६ |
| एकुण | १०१,२६२ | २५३,१५५ | २२७,८४० | २५,३१५ | १,३४७ | |

**<u>घनकचरा निर्मिती व व्यवस्थापन</u>** – विकास प्रक्रियेत ओव्हरबर्डन (overburden) दूर केल्या जाते व हे ओव्हरबर्डन म्हणजे चुनखडी/डोलोमाइट चे आच्छादन असते. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे सादर केला आहे.

**टेबल २ वर्षिक मातीनिर्मिती**

| वर्ष | खाणी अंतर्गत क्षेत्र | फ्लोर आर एल (एम आर एल) | चुनखडीचे उत्पादन रोम टनस् | माती/रिजेक्ट (मी$^3$/ टनस्) |
|---|---|---|---|---|
| १ मे ५ | १.४०७० | २१८ | २२७८४० | १,३४७/२५,३१५ |
| ६ ते २० वर्षे **(१५ वर्षे )** | ३.४०० | २१६ | ७,५००,००० | ७,२२५/७५,००० |

घनकचरा खाणीतील गैर–खनिज (Non & Mineralized) क्षेत्रात टाकण्यात येईल. स्थिरीकरणानंतर अश्या ढिगाऱ्यांवर स्थानिक प्रजातींच्या वनस्पतींची लागवड केल्या जाईल. वर्षनुवर्षपासुन तयार होणारा डम्प हा पंचवार्षिक विकास व उत्पादन योजनेमध्ये दर्शविला आहे.

**<u>जलनिस्सार</u>** – प्रस्तावित क्षेत्राची भौगोलिक रचना ही सपाट असुन याच्या तळाशी चुनखडी/डोलोमाइटचे आडवे थर आहे. हया क्षेत्राची समुद्र सपाटीपासून उंची कमाल २२८ मी. व किमान २२० मी. आहे. प्रस्तावित क्षेत्र हे पातळ रेताळ मातीने आच्छादित असुन त्याची जाडी ०.१ मी. ते ०.३ मी. इतकी आहे. हया क्षेत्राचे जलनिस्सारण दक्षिण–पश्चिम दिशेने आणि लहान नाल्याद्वारे वाहुन क्षेत्रापासुन सुमारे १.५ कि. मी. अंतरावर दक्षिण दिशेने पेनगंगा नदीला मिळतात. हे क्षेत्र कृषी व पडीत जमीनीने वेढलेले आहे.

**भूजल** (Ground Water) – खनन प्रक्रीया जास्त खोलीपर्यंत होणार नसल्यामूळे भूजल पातळीवर परीणाम होणार नाही. प्रस्तावित खनन प्रक्रियेद्वारे भूगर्भातील पाण्याच्या गुणवत्तेवर कुठलाही परिणाम होणार नाही. तसेच चुनखडी/डोलोमाइटच्या उपस्थीतीमुळे पाण्यामध्ये कुठल्याही प्रकारचे विषारी घटक आढळून येत नाही.

**जिलनिष्कासन व्यवस्था** – पावसाळयात खड्डयात जमा झालेले पाणी योग्य डीझेल पंपाच्या साहाय्याने बाहेर काढण्यात येईल. पाणी नाल्यात सोडण्याच्या अगोदर विषारी घटकांची चाचणी केली जाईल.

**पर्यावरणीय आधाररेखा स्थिती** – बहिलामपुर चुनखडी/डोलोमाइट खाणीचे एकूण क्षेत्रफळ ४७. १२ हेक्टर आहे. या कोर झोनच्या १० कि.मी. आसपासचे क्षेत्र बफर झोन आहे. आधाररेखा पर्यावरण विषयक सर्व घटक गोळा करण्यात आले. यात प्रामुख्याने पर्यावरणीय घटक जसे हवामान, हवा, पाणी, ध्वनी, मृदा (माती), भुगर्भ, भूजल, पशु–पक्षी व सामाजिक–आर्थिक औद्योगिक, पुरातत्व, स्थानिय ऐतिहासिक महत्त्वांची स्थाने इ. आहेत, हया EIA अहवालात प्राथमिक सर्वेक्षणाद्वारा गोळा करण्यात आलेली माहिती सामाविष्ट करण्यात आली आहे. प्राथमिक सर्वेक्षण उन्हाळी हंगामात ३ महिन्यांसाठी मार्च २०१६ ते मे २०१६ पर्यंत करण्यात आली.

**बफर झोन मधील भूमिचा उपयोग** – १० कि.मी. क्षेत्र जे अध्ययन/अभ्यास क्षेत्र चुनखडी/डोलोमाइट खाणीच्या सभोवताली आहे त्याचे एकूण क्षेत्रफळ ४७.१२ हेक्टर आहे. या क्षेत्राचा अधिकांश म्हणजे ६६.८७% भाग कृषी क्षेत्राखली आहे आहे. (सिंचित क्षेत्र – १.७४% आणि असिंचीत क्षेत्र ६५.१३%), कृषीयोग्य पडित भूमि ५.००%, अकृषियोग्य भूमि ९.००% आहे. जंगल व्याप्त क्षेत्र १९.१३% आहे. अभ्यास क्षेत्रा संबधित १० कि.मी. क्षेत्राचे उपग्रह चित्र हैद्राबाद स्थित नॅशनल रिमोट सेन्सिंग एजन्सीकडून प्राप्त केली आहे.

**भूजल स्तर** – बफर झोन क्षेत्रात १८ गावातील ३० विहिरींची माहिती एकत्रित केली गेली. पावसाळयापूर्वी भूजलस्तर बफर झोन मधे ३.५ ते ११.१ मी तर सरासरी ६.४८ मी दरम्यान व पावसाळ्या नंतर भूजलस्तर ०.८२ ते ७.७० मी तर सरासरी ३.०९ च्या दरम्यान आढळला. कमालीच्या दोन ऋतुमध्ये पाण्याची सरासरी पातळी ही ३.३९ मी. एवढी असते.

**पाण्याची गुणवत्ता** – प्रस्तावित खाणीच्या जवळपासच्या क्षेत्रात भुगर्भीय व भुस्तरीय पाण्याची गुणवत्ता तपासणी करण्यात आली आहे व हया क्षेत्रात कुठलेही हंगामी नाले व बारामाही प्रवाह आढळून येत नाही. ही पाण्याची नमूने MoEF च्या नियमानुसार सर्व पाण्याची स्थिती लक्षात घेऊन निवडले आहेत. एकूण ५ भूपृष्ठ (surface) व ५ भूजल (ground) नमूने गोळा करण्यात

आले. पाण्याच्या नमुन्यांचे भौतीक–रासायनिक वैशिष्टयांचे विश्लेषण EIA/EMP च्या प्रकरण–३मध्ये विषद केले आहे.

**परिवेशी वायु गुणवत्ता**–अध्ययन क्षेत्रात परिवेशी वायु गुणवत्ता तपासण्यासाठी १३ आठवडे (मार्च २०१६ पासून मे २०१६) निरंतर निरीक्षण केले गेले. हया दरम्यान सी.पी.सी.बी. च्या नियमांचे पालन करण्यात आले. कोर झोन व बफर झोन क्षेत्रातील वाऱ्याची दिशा व अन्य हवामान घटकांच्या आधारावर परिवेशी वायु गुणवत्ता तपासणी करिता नऊ स्थानांची निश्चिती करण्यात आली.

**वायु गुणवत्ताः–** $PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$, NOx मुल्ये एकूण ९ स्थानकांवर वायु गुणवत्ता तपासली गेली. ती खालिलप्रमाणे आहे.

- $PM_{10}$ – अभ्यास क्षेत्रामध्ये २४ ताशी आधारावर परिवेशी हवा गुणवत्ता निरीक्षण ९ स्थानकांवर केले गेले. $PM_{10}$ ची जास्तीत जास्त तिव्रता ४३.६ ते ५४.८ $\mu g/m^3$ च्या कक्षेत होती, ज्याचा स्तर NAAQ च्या प्रावधालित स्तर १०० $\mu g/m^3$ च्या आत होता.
- ($PM_{2.5}$) – २४ तासांच्या सर्वेक्षण दरम्यान $PM_{2.5}$ ची अधिकतम तिव्रता १८.२ ते २९.६ $\mu g/m^3$ या दरम्यान होती, जी ६० $\mu g/m^3$ या NAAQ च्या प्रावधानित स्तरापेक्षा कमी आहे.
- **सल्फर डॉय ऑक्साईड** ($SO_2$) – २४ तासांच्या सर्वेक्षण दरम्यान $SO_2$ ची अधिकतम तिव्रता ११.८ ते २६.४ $\mu g/m^3$ दरम्यान होती जी ८० $\mu g/m^3$ या NAAQ च्या प्रवधानित सरापेक्षा कमी आहे.
- NOx – २४ तासांच्या सर्वेक्षण दरम्यान NOx ची अधिकतम तिव्रता १५.८ ते २५.९ $\mu g/m^3$, दरम्यान होती जी ८० $\mu g/m^3$ या NAAQ च्या प्रावधानित स्तरापेक्षा कमी आहे.

**ध्वनी स्तर –** हया अभ्यास क्षेत्रात सविस्तर ध्वनी सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणानुसार ९ स्टेशनवर आवाजाची/ध्वनी पातळी ३७.६ पासून ५४.९ dBA पर्यंत च्या श्रेणीत आहे. हे निवासी क्षेत्राच्या अनुसार दिल्या गेलेल्या मानक मर्यादापेक्षा कमी आहे.

**मातीची गुणवत्ता** – अभ्यास क्षेत्रात ४ निवडलेल्या ठिकाणी मातीचे नमूने गोळा केले गेले. प्रस्तावित खाण क्षेत्रात मातीच्या विद्यमान स्थितीचे मुल्यांकन करण्यात आले. साधारण मातीचा मध्यम कस आहे व जिराईत पिकांच्या लागवडीसाठी माफक प्रमाणात योग्य आहे.

**जीवशास्त्रीय पर्यावरण** – कोर व बफर झोन क्षेत्रामध्ये गावांची वसाहत आहे. गावांमध्ये लागवडीखालील क्षेत्र, जंगल व्याप्त क्षेत्र तसेच पडिक जमिनीचा प्रदेश समावलेला आहे. या

क्षेत्रात वनस्पती व प्राणी प्रजातींची विस्तृत यादी तयार करण्यात आली आहे. वनस्पती आणि प्राणी यांचा तपशील EIA/EMP मध्ये विषद केला आहेत. अभ्यास क्षेत्रात बॉयोस्फिअर रिजर्वस्, राष्ट्रीय उद्यान, जीवसृष्टी वन्यजीव क्षेत्र, विशिष्ट प्रदेशातील किंवा कालखंडातील प्राणिजात औषधी व आर्थिक महत्त्व असलेले वनस्पती १५ कि.मी. क्षेत्रात आढळले नाही.

**<u>मानवी वसाहत व लोकसंख्या</u>** – अभ्यासासाठी निवडलेल्या क्षेत्रात ५० गावांची वसाहत आहे. या क्षेत्रात ९७६९ घरे असून त्यांची लोकसंख्या ५०२२३ आहे. एकूण लोकसंख्येपैकी २८७५४ पुरूष व २४४६९ महिला आहेत. महिलांची संख्या प्रति १००० पुरूषांच्या संख्येच्या तुलनेत ९५० आहे. एकंदरीत साक्षरता ७३.३७% आहे.

**<u>प्रस्तावित सामाजिक जबाबदारीची मापे</u>** – प्रस्तावित सामाजिक जबाबदारीचा तपशील प्रकरण ४ मध्ये दिला आहे. गावकऱ्यांशी सल्लामसलत करून स्थानिक समुदाय आधारित संस्थेच्या मदतीने क्षेत्रविकास कार्यान्वियनासाठी बफर झोन मधे जवळच्या ग्रामीण भागातील निवडक गावांमधे पध्दतशिर दृष्टीकोन विकसित केला. गावकऱ्यांना आरोग्य स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, साक्षरता, बचतगट, इ.पायाभूत सुविधा संदर्भात विकास क्षेत्रात सहाय्य केले जाईल. वार्षिक आवर्त्ती खर्च म्हणून दरवर्षाला ५ लाख रूपये अशी एक अर्थसंकल्पिय तरतूद या खात्यासाठी प्रस्तावित केली आहे. अभ्यासाकरिता निवडेलेल्या क्षेत्रातंर्गत ५० गावांचा समावेश होतो. २०११ च्या जणगणनेनुसार १८ गावांमध्ये लोकसंख्या १–५००, १४ गावांमध्ये ५०१–१०००, १५ गावांमध्ये १००१–२००० व ३ गावांमध्ये २००० पेक्षा जास्त आढळते. मेहंदी गावामध्ये सर्वात कमी ५९ तर मुकुटबन गावात सर्वात जास्त ६७८५ लोकसंख्या आढळते.

**<u>जोखिम मुल्याकंन व आपत्ती व्यवस्थापन आराखडा</u>** – खाण अधिनियमाच्या तरतुदी नुसार, कोणत्याही खाण प्रकल्पात, कामांतर्गत सुरक्षा बाळगणे हा नियम आहे. Blasting च्या वेळी खडक उडणे, विस्फोटकांच्या हाताळणी आणि वापर संबधीची जोखीम, वाहनांची वाहतुक आणि वापर संबधीची जोखीम, संबधित उपकरणांची जोखिम इ. गोष्टी हाताळल्या गेल्या आहेत. सक्षम अधिकाऱ्यांच्या निर्देशनांनुसार जोखिम व्यवस्थापन योजना काटेकोरपणे राबवण्यात येईल.

## पर्यावरणीय व्यवस्थापन योजना

**<u>वायु प्रदूषण व्यवस्थापन</u>** –

- अंतर्गत मार्गावर पाण्याचा शिडकाव केल्या जाईल. पाण्याच्या टँकर सह स्प्रिंकलर ची व्यवस्था केली जाईल.

- खनिज वाहतुकीच्या दरम्यान धुळ प्रसार टाळण्यासाठी खनिज तारपोलिनद्वारे झाकून संरक्षित केले जाईल.
- वाहने व यंत्र सामुग्री यांची नियमित देखभाल केली जाईल ज्यामुळे प्रदूषणास आळा बसेल.
- विविध ठिकाणी हरितपट्टयाचा विकास केला जाईल.
- धुळ रोधक मास्क सर्व कामगारांना वितरित करण्यात येईल.
- प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी अंतर्गत निगराणी केली जाईल व त्या संदर्भात योग्य देखभाल घेतली जाईल.

**जल प्रदूषण व्यवस्थापन** – खाण प्रकल्पा मध्ये पिण्याचे पाणी शिवाय खाण प्रक्रियेसाठी व वनस्पती इ. बाबींसाठी पाण्याची नितांत गरज असते. खुल्या खाणीमध्ये पाण्याच्या प्रदूषणाचे मुख्य स्त्रोत पावसाचे पाणी असते. कोरडया हवामानात कोणत्याही खाणीत पाण्याचा पाझार असण्याची शक्यता नाही. पावसाळयात खाणीत पाणी जमा होऊन त्यात गाळ जमा होऊ शकतो विशेषत: बारीक माती जमा होऊ शकते. पावसाचे पाणी सेटलिंग टँक मधे जमा करून त्याचा उपयोग वृक्षारोपण व धुळ नियंत्रणसाठी केला जाईल.

**ध्वनी व कंपन व्यवस्थापन–**

- योग्य यंत्राची निवड, सुयोग्य इन्टॉलेशन, ध्वनीरोधक आवरण, पॅडींग इ. साधनाद्वारा ध्वनी प्रदूषण नियंत्रित केले जाईल.
- खाणीच्या सभोवताली वृक्षारोपण केल्या जाईल. ७.५ मी रूंदीच्या बाहेरील पट्टयात विविध उंचीच्या झाडांचा समावेश करुन हा हरितपट्टा आवाजाचे प्रसारण व पातळी नियंत्रित करण्याकरीता उपयोगी ठरेल.
- स्फोटकामध्ये (Blasting) मिलीसेंकद डिले डिटोनेटोर्स चा उपयोग केल्या जाईल. Vibrations ला नियंत्रित ठेवण्यासाठी याचा उपयोग होईल.

**भूमी संवर्धन** – खाणीत खुल्या पध्दतीने खनन केल्या जाईल. मातीचा साठा, खनन कालावधी कालबाहय झाल्यावर, पुढील कालावधीसाठी त्याचेच नुतनीकरण करण्याात येईल त्यामुळे back filling / पुर्णभरणाची आवश्यकता राहणार नाही. नियमितपणे गैर–खनिज भागावर (Non-Mineralized Zone) वृक्षारोपण करण्यात येईल.

**वृक्षारोपण** –वृक्षारोपण करण्यासाठी स्थानिक प्रजातींची निवड केल्या जाईल. यासाठी वन विभागाची मदत घेतल्या जाईल. यामुळे खाणीतून निघण्याऱ्या धुळीवर नियंत्रण ठेवण्यात मदत होईल.

**प्रस्तावित वृक्षारोपण कार्यक्रम**

| कालावधी | हरितपट्टा (सुरक्षित क्षेत्रासाठी व खनन क्षेत्रासाठी) | |
|---|---|---|
| | हेक्टर | प्रजाती |
| १ ते ५ वर्षांपर्यंत | ०.४५ | ५०० झाडं @१००/वर्ष |
| ६ ते २० वर्षांपर्यंत | १.८० | १५०० झाडं @१००/वर्ष |
| २१ ते शेवटपर्यंत | ब्लॉक A – ३.४ | २५०० |

**व्यवसायिक**

- सर्व खाण कामगारांची ५ वर्षात एकदा जवळच्या रूग्णालयातून छातीचा क्ष–किरण, फुफ्फुस कार्य चाचणी, ऑडियोमेट्री, टी.बी., मलेरिया, एच.आय.वी. इत्यादी चाचण्या केल्या जातील.
- खाण कामगारांकरिता शुध्द पाणीपुरवठा प्रस्तावित केला आहे.
- सुरक्षा समितिचे गठन केले जाईल. ही समिती प्रस्तावित OSHA व्यवस्थापन योजना, पर्यावरण व्यवस्थापन कार्यक्रम आणि EIA/EMP नुसार योग्य उपाय योजनांचे क्रियान्वयन केले जाईल.
- व्यवसायीक चिकित्सकाच्या सेवा नियमितपणे अवलंबविल्या जातील.
- खाण कामगारांच्या आरोग्याची चिकित्सा करुन व त्यासंदर्भात उपचारांचा खर्च खाण मालकाद्वारे केल्या जाईल. कामगाराची सेवा संपेपर्यत किंवा खाण बंद होईपर्यंत त्यांच्या वैयक्तिक आरोग्याचा लेखाजोखा पुरस्कर्ताद्वारे ठेवला जाईल व गरजेनुसार कार्यवाही करण्यात येईल. पर्यावरण संरक्षणासाठी आवर्ती वार्षिक खर्च अंतर्गत बजेट चे प्रावधान केले आहे.

**संभाव्य रोजगार** – या खाणीकरिता साधारण ३५ कामगारांची आवश्यकता आहे. तसेच व्यवस्थापन कर्मचारी खाण व्यवस्थापक, खनन अभियंता व भुस्तरशास्त्रज्ञ, खाण कामगारांचा प्रमुख, माईनिंग मेट व सुरक्षा अधिकाऱ्याची नेमणूक केल्या जाईल. शैक्षणिक व शारीरिक अहर्तेनुसार स्थानिक मनुष्यबळाचा वापर प्रस्तावित केला आहे.

सध्याचे खाण क्षेत्र दुर्गम भागातील आहे आणि अविकसित या श्रेणीत येते. येथे राहणाऱ्या लोकांचे राहणीमान साधारण आहे. खनन सारख्या औद्योगिक गतिविधी मुळे बफर झोन अंतर्गत राहणाऱ्या लोकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. खाणकामामुळे होणाऱ्या इतर सोयी सुध्दा लोकांना मिळतील. भांडवली गुंतवणुक रू. ५ लाख व आवर्ती खर्च रूपये ५ लाखाचे व्यवस्थापन बजेट मध्ये केले आहे.

# स्मारोप

पर्यावरण प्रक्रियेनुसार पर्यावरण मान्यतेसाठी अर्ज केला आहे. वन आणि पर्यावरण मंत्रालय (MoEF), भारत सरकारने आखलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आवश्यक वैज्ञानिक अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तावित प्रकल्प प्रभावाकरिता सर्व तज्ञ, सक्षम अधिकारी आणि शासकीय अधिकारी यांच्या सुचना/शिफारसी अवलंबविल्या जाणार आहेत. प्रस्तावित खनन प्रकल्पाची पर्यावरण व्यवस्थापन योजना बनवण्यासाठी व प्रकल्पामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी स्थानिक रहिवाश्यांचा समुदाय आधारित संस्थांचा, सामाजिक संस्थाचा दृष्टिकोन व मार्गदर्शनाचा अत्यंत उपयोग होईल. पर्यावरणाच्या सर्व घटकांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात येईल. स्थानिक लोकांच्या सहकार्याशिवाय हा प्रकल्प अशक्य आहे. प्रस्तावित बहीलामपुर चूनखडी/डोलोमाईट खाणींचे (४७.१२ हेक्टर) काम सुरू करण्यापूर्वी संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडून सर्व आवश्यक अनिवार्य मान्यता प्राप्त करण्यत येईल. श्री राजा खंडेराव देशमुख पालशीकर पर्यावरण सुधारणेसाठी सुचनांची अंमलबजावणी करण्यास बांधील आहोत. तसेच नैसर्गिक संसाधने संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्नशील राहू.